माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ /२८१५/२०२५/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| संजय निवृत्ती ढेरंगे | प्रशासन अधिकारी<br>कर आकारणी व कर संकलन विभाग,<br>पुणे महानगरपालिका | सहा. आयुक्त<br>कर आकारणी व कर संकलन विभाग,<br>पुणे महानगरपालिका |

**(सुनावणी दिनांक- ०२.०७.२०२६)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि.१४.०७.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती दिली नाही, असे नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागीतलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| ०७.०४.२०२५ | प्लॉट नं. अ १७ बी कुलदिप वरपे रागविलास सोसायटी या मिळकतीबाबत महापालिकेत केलेली नोंदणी,नोंदणीसाठी केलेला अर्ज,अअर्जासोबत जोडलेले कागदपत्रे,सदर मिळकतीचे कर आकारणी बाबत माहिती,कर पावत्या चौकशी अहवाल,जाब-जबाब टिपा-टिपणी,निवासी किंवा अनिवासी मिळकत बाबत माहिती, शासकीय नियमावली इ. माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, " अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती बाबत दि. ०२.०५.२०२५ व दि. ०६.०८.२०२५ रोजी उत्तर दिले आहे. "

उपलब्ध अभिलेखांच्या पाहणीतून, जन माहिती अधिकारी यांनी दि. ०२.०५.२०२५ च्या पत्राने दिलेल्या उत्तरामध्ये अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या क्रमांकाची नोंद नसल्याने मिळकत क्रमांक अथवा जुनी टॅक्स भरल्याची पावती देणेबाबत अपिलार्थी यांना कळविल्याचे दिसून येते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.०६.२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थी यांच्या कडून  मिळकती संदर्भात शोध घेण्यासाठी प्रॉपर्टी नं. मिळाल्यानंतर देता येणारी माहिती  १५ दिवसात देण्याचे आदेश देऊन अपिल निकाली काढल्याचे दिसून येते. प्रथम अपिल आदेशानंतर जन माहिती अधिकारी यांनी  दि. ०६.०८.२०२५  च्या पत्रान्वये अपिलार्थी यांना पुनःश्च मिळकत क्रमांक व योग्य मालकाचे नाव दिलयास माहिती शोधने साईचे होईल असे कळविल्याचे दिसुन येते. सुनावणीकामी अपिलार्थी गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे समजू शकले नाही. प्रकरणी नियमाप्रमाणे कार्यवाही झाली आहे.

सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र.रामाआ /२८१५/२०२५/पुणे 4345/2026 दिनांक - 23/9/26.